Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - VI April 2015

# भारतातील राजकीय नेतृत्व निर्मीतीचे सैध्दांतीक विश्लेषण

डॉ. मंगेश ह. कदम
सहाय्यक प्राध्यापक तथा सहाय्क संचालक (सामाजिक शास्त्रे),
दूरस्थ शिक्षण केंद्र. एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई.
महाराष्ट्र-४०००४९

स्वातंत्र्योत्तर काळापासुन भारतीय राजकीय नेतृत्वाची वाटचाल राष्ट्रीय, राज्य ते स्थानिक अशी झाल्याचे दिसून येते. कोणत्याही समाजातील राजकीय नेतृत्वातील बदल हे येथिल राजकीय निर्णय तसेच सामाजिक, आर्थिक व राजकीय बदलातून होत असतात.. स्थानिक शासनात मागास जाती आणि स्त्रीयांना मिळालेल्या आरक्षणातून विविध जातींतील त्याच बरोबर स्त्रीयांतील नेतृत्व स्थानिक राजकारणात पुढे येतांना पहावयास मिळाले. याच काळात प्रादेशीक पक्षांची वाढती संख्या आणि काँग्रेस या पक्ष कमकुवत होत जाण्यातून विविध प्रदेश तसेच जात समुहातुन राज्यस्तरीय नेतृत्व ही उदयास येण्यास अजुनच चालना मिळाली, म्हणजेच १९९० चे दशके हे भारतीय राजकारणातील नेतृत्वाच्या स्वरुपात अमुलाग्र बदल करणारे दशक असल्याचे दिसून येते. थोडक्यात भारतीय स्वातंत्र्य लढा त्यातून मिळालेले स्वातंत्र्य आणि त्याच्या परिणामी निर्माण झालेले नेतृत्व, भाषावार प्रांतरचना तसेच ७३ व ७४ व्या घटनादुरुस्ती या घडामोडींचा परिणाम प्रामुख्याने रष्ट्रिय, राज्यपातळीवरील व स्थानिक नेतृत्व निर्मीतीवर आपणास दिसून येतो.

१९८० च्या दशका पर्यंतचे भारतातील राजकारण काँग्रेस वर्चस्वाचे होते. या दशकाच्या शेवटी प्रथम बिगर काँग्रेस शासन केंद्रात सत्तारुढ झाले, अर्थात या आधीच १९७० च्या दशकात राज्यांच्या राजकारणात काँग्रेसच्या प्रभुत्वाला प्रथम राज्य पातळीवरील राजकारणात आव्हानीत केले गेले होते, इथेच काँग्रेसच्या ऱ्हासाला सुरुवात झाली होती. आणीबाणी नंतरच्या काळात सत्तेवर आलेले जनता पक्षाचे पहिले बिगर काँग्रेस सरकार केंद्रात आले. त्यानंतर पुढील निवडणूकीत पुन्हा काँग्रेसची सत्ता केंद्रात आलेली असली तरीही काँग्रेसच्या ऱ्हासाची ही प्रक्रिया सुरुच राहिली. काँग्रेस प्रभुत्वाच्या ऱ्हासातून विविध राज्यात सत्तेवर आलेल्या बिगर काँगेस पक्षाच्या राजकारणातून भारतीय राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासात बदल होत गेले. भारतातील राज्याच्या राजकीय प्रक्रियेचा अभ्यास सर्वप्रथम मायरॉन वीनर (१९६८) तसेच इकबाल नारायण् (१९७६) यांनी सुरु केला, फ्रँकेल आणि राव यांनी (१९८९-९०) राज्याच्या अभ्यासाची चौकट बदलून एकेका राज्याच्या संदर्भात आर्थिक, सामाजिक आणि राजकीय बाबींचे राजकारणातील व समाजव्यवहारातील स्थानास अधोरेखित केले..

ऐतिहासिक बदल आणि राजकीय नेतृत्व:

भारतीय राजकीय प्रक्रियेत झालेल्या बदलाचा परिणाम हा येथिल राजकीय नेतृत्वावरही होतांना दिसतो. भारतीय स्वातंत्र्य लढयात सर्वप्रथम उच्च जाती, उच्च शिक्षीत, शहरी व अभिजन वर्गातील सहभाग अधिक आढळतो. १९२० च्या कालखंडात भारतीय स्वातंत्र्य चळवळ अधिक व्यापक होत गेली ग्रामीण भारतातही ती पसरली, स्वातंत्र्य चळवळीत देशभरातील विविध भागातील सामान्य जनतेचा सहभाग वाढला परिणामी राजकीय

*नेतृत्वाचे सामाजिक स्वरुपही बदलेले. राजकीय नेतृत्वात मध्यम व शेतकरी जातीं त्याचबरोबरच ग्रामीण भागातून आलेल्या नेतृत्वाचा सहभाग वाढला. स्वातंत्र्योत्तर कालखंडात लोकशाही निवडणूकीच्या माध्यमातून त्यात अजुनच भर पडली. म्हणजेच स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारतीय नेतृत्व उच्च, मध्यम जाती व शेतकरी जातींचे बनत गेले. राजकीय नेतृत्वात स्वातंत्र्योत्तर कालखंडात महत्वाचा बदल झाला तो म्हणजे भाषावार प्रांतरचनेमुळे. परिणामी केंद्रीय नेतृत्वापेक्षा प्रादेशिक राजकीय पक्ष व प्रादेशीक नेतृत्वाचा राजकारणातील सहभाग व महत्व वाढत गेले. प्रादेशिक पक्षांचे वाढते महत्व व काँगेस पक्षाच्या ऱ्हासातून भारतीय राजकारणत प्रादेशिक नेतृत्वाचे स्थानही वाढु लागले.*

*भारतातील राष्ट्रीय व राज्यस्तरीय राजकीय नेतृत्वाचे सैध्दांतीक विश्लेषण:*

*भारतातील नेतृत्व हे सामाजिक व राजकीय बदलावर आधारीत आहे. भारतातील नेतृत्व बदलत्या आशियातील आणि प्रामुख्याने भारतातील स्वातंत्र्य चळवळी या केवळ पाश्चिमात्य राज्यकर्त्यांना पळवून लावण्यासाठीच नव्हत्या तर, पाश्चात्य आधुनिक शिक्षण घेतलेल्या व्यक्ती, पत्रकार, डॉक्टर, वकील यांची येथिल प्रस्थापित जमिनदार, महाराजा, परंपरागत प्रशासकाचे नेतृत्व बदलून नवीन नेतृत्व निर्माण करण्यासाठीच्या चळवळी होत्या. सुरुवातीच्या काळात राष्ट्रीय चळवळीतील नेतृत्व प्रामुख्याने सागरी किनारपट्टी असलेल्या शहरातूनच पुढे आलेले दिसते उदा. मुंबई, मद्रास, कलकत्ता इ. मात्र १९२० नंतर स्वातंत्र्य चळवळीचा व्याप वाढविण्यासाठी नेतृत्वास ग्रामीण भारताच्या पाठींब्याची गरज भासली त्यातून ग्रामीण भागातील नेतृत्वाचा राजकारणात प्रवेश होण्यास सुरुवात झाली. परिणामी प्रस्थापित नेतृत्वाची भौगोलिक, सामाजिक व आर्थिक वैशिष्ट्ये बदलली. सामान्य लोकांमधुन तसेच विविध भागातून पुढे आलेल्या नेतृत्वामुळे राजकीय धोरण हे अभिजन आणि सर्वसामान्य जनतेस सामावून घेणारे बनले. भारतीय धोरणात नेहमीच अभिजन आणि सामान्य जनता असा भेद राहिलेला आहे. १९२० नंतरच्या काळात तसेच स्वातंत्र्योत्तर कालखंडात अभिजन आणि सामान्य लोकांना महत्व देणारे मध्यम वर्गीय नेतृत्व निर्माण होण्याची परंपरा सुरु झाली. मध्यम वर्गीय नेतृत्व हे सामाजिक रचना आणि शासन यातील दुवा होते. या नेतृत्वाला स्वत:च्या समुहाचा पाठींबा होता. उदा. कामगार युनियन, शेतकरी, विशिष्ट जाती-जमाती, नागरी समाजाच्या संघटना इत्यादी तर संस्थानिक, जमिनदार हे स्वातंत्र्य चळवळीत सामिल नव्हते. भारतीय राजकारणात ग्रामिण मध्यम वर्गातून नेतृत्व पुढे येण्यास सुरुवात झाली. थोडक्यात भारतातील राष्ट्रीय पातळीवरील अभिजन व ग्रामिण भारतातील नेतृत्व निर्मीतीही वैशिष्टयपूर्ण राजकीय परिस्थिती, राजकीय रचनेतील बदल यातून झाल्याचे दिसून येते. भारतीय नेतृत्वासमोर प्रामुख्याने तीन महत्वाची कामे असतात ती म्हणजे १. जनतेत लोकशाही संस्था मजबूत करणे, २. विकास व आधुनिकिरणाची प्रक्रिया राबविणे आणि ३. सामाजिक बदलाचा वाहक म्हणून काम करणे. भारतात नेतृत्व हे इतिहास, विचारसरणी, सांस्कृतीक वारसा आणि सामाजिक रचना यांतील परस्परसंबंधातून तयार होते. व्ही. एम सिरसिकर (१९६५ ) यांनी भारतीय नेतृत्वाच्या विकासाचे विविध टप्पे सांगितले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातील*

*पहिल्या टप्प्यातील नेतृत्वाच्या स्वरुपाबाबत ते म्हणतात की, स्वातंत्र्य चळवळीच्या काळात नेतृत्व; राष्ट्राचे स्वातंत्र्य, एकता, अहिंसा, यावर भर देणारे होते तसे करणे त्यावेळच्या नेतृत्वास गरजेचे होते. तो काळ*

*राष्ट्रवादी विचारांचा असल्याने वर्गीय, समुहप्रधान हितसंबंध जपणे तेव्हा शक्य नव्हते व तसे केल्यास नेतृत्व स्विकारले गेले नसते. त्या काळातील सामाजिक दबावानुसार नेतृत्वाला राष्ट्रीय असणे भाग होते, राष्ट्रीय नेतृत्वाला संकुचित भुमिका घेणे शक्य नव्हते कारण नेतृत्व हे त्याग व बलिदानावर आधारलेले होते.*

*दुसरा टप्पा स्वातंत्रोत्तर काळखंडाचा आहे, या कालखंडात सत्तेच्या इच्छा उफाळून आल्या. काँग्रेस आणि बिगर काँग्रेस अशा दोन परंपरा अस्तित्वात होत्या. कॉग्रेसचा राष्ट्रवादी चळवळीत सक्रिय सहभाग होता तर दुसरी परंपरा ही स्वातंत्र्य चळवळीपासून अलिप्त होती. या कालखंडात पंचवार्षीक योजना, नवी राज्यघटना, सरदार पटेलांचा मृत्यु जनसंघाची स्थापना व नेहरुवादाचा उदय या प्रक्रिया दिसतात. नेहरुवादातून इतर नेतृत्व झाकोळले गेले होते त्यामूळे पक्ष आणि शासन दोन्हींवरही नेहरुचे वर्चस्व होते.*

*तिसरा टप्पा हा प्रादेशिक नेतृत्वाच्या उदयाचा आहे. भाषावार प्रांतरचनेतून प्रादेशिक नेतृत्वाचा उगम झाला. त्यांच्या मते प्रादेशिक नेतृत्व हे मध्यम जातीतील शिक्षित व श्रीमंत वर्गातून आलेले होते. या नव नेतृत्वाला जनमताचा तसेच स्थानिक प्रभावी जातींचा पाठींबा होता व त्याचे मतदारसंघ निश्चत होते. परिणामी भारतीय राजकारणातील नेतृत्व हे दिल्लीकडून राज्यांकडे सरकणे सुरु झाले त्यातून केंद्रीय नेतृत्व व पक्षाचे महत्व कमी होण्यास प्रारंभ झाला. या नव नेतृत्वात वाटाघाटींची क्षमता अधिक होती. याच काळात राज्यपातळीवरील दबाव गटांची संख्याही वाढू लागली. नव नेतृत्व निर्मीतीची प्रक्रिया ही व्यवसाय, औद्योगिक हितसंबंध आणि राजकीय नेतृत्व यांच्यातील संबंधावार आधारीत होती असे ते मानतात. त्यांच्या मते १९६२ मधील चीनी आक्रमणानंतर नेहरुची राजकारणावरील पकड सैल झाली त्यातून अंतर्गत राजकारणही बदलले. विरोधक सुत्रबद्धपध्दतीने उभे राहिले, अनेक काँग्रसचे नेते पक्षातून बाहेर पडले. देशाच्या राजकारणात नेतृत्वाच्या नव निर्मितीची ही सुरुवात होती. विविध कालखंडात व राजकीय पेचप्रसंगी भारतीय पंतप्रधानांनी घेतलेले निर्णय व धोरणे तसेच महत्वाच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घटनेप्रसंगी घेतलेले निर्णय यातून भारतीय नेतृत्व विकसित होतांना दिसते.*

*भारतीय नेतृत्वाला प्रामुख्याने तीन प्रकारची कामगिरी पार पाडावी लागते. पहिली, राजकीय व प्रशासकिय संस्था अबाधित ठेवणे. यामध्ये बदलते सामाजिक, आर्थिक वास्तव, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, शेती तंत्रज्ञान, औद्योगिकरण तसेच विविध समुहांना शासन व प्रशासनात समाविष्ट करुन घेणे नोकरशाहीतील सुधारणा, पोलिस सुधारणा अशा विविध संस्थात्मक बदलाची भुमिका नेत्यांना घ्यावी लागते. येथिल राजकीय नेते अशा पध्दतीने निर्णय घेतांनाही स्वत:चे मतदार संघ अबाधित ठेवण्यातच धन्यता मानतात. शासकीय यंत्रणेचा वापर येथिल नेतृत्वाने स्व:ताच्या स्वार्थासाठी व विरोधकांना नियंत्रित करण्यासाठी केला. दुसरी महत्वाची कामगिरी म्हणजे समस्या निर्धारण आणि धोरण आखणी. देशात निर्माण होणाऱ्या विविध समस्या व त्यानुसान घेतले जाणारे निर्णय हे नेतृत्वाच्या व्यक्तीमत्वानुसार घेतले जातात. अनेकदा निर्णय हे वरिष्ठ व वैयक्तीक पातळीवर घेतले जातात. असे निर्णय योग्य की अयोग्य हे निवडणूकित मतदारांनी केलेल्या मतदानानुसार हे ठरले जाते.*

*राजकीय नेतृत्वाची सर्वात महत्वाची भुमीका ही राष्ट्राची एक राजकीय समुह म्हणुन निर्मिती करण्याची आहे. विविध सामाजिक, भाषिक अस्मीता, सांस्कृतीक व वांशीक संघर्ष यांना सत्तेत व विकासात*

सामावून घेण्याचा प्रयत्न हा नेतृत्वाच्या पातळीवरही करावा लागतो. त्यामुळे भारतातील राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न हा विविध नेत्यांना सत्तेत वाटा आणि विकास प्रक्रियेतील विविध समुहांना सामावून घेणे याशी निगडीत आहे. नेत्यांकडील सत्ता, अधिमान्यता आणि धोरणास लोकांचा असणारा पाठिंबा यातून नेतृत्वाचा मार्ग निश्चित होत असतो. भारतीय राजकारणात नेतृत्वाची विशिष्ट क्षमता असणाऱ्या नेत्यांचीच उच्चस्थानि निवड होत असते. नेतृत्वाची निवड आणि अधिमान्यता ही सार्वजनिक निवडणूकितून प्राप्त होत असते. पक्षांतर्गत विरोधकांवर मात करुन नेतृत्व स्थानी येणे, राजकीय समुहाला दिशा दर्शन करण्याची क्षमता असणे तसेच निवडणूकीत विजयी होणे यातून राजकीय नेतृत्व सिध्द होते. निवडून आल्यानंतरही नेतृत्वाने घेतलेले निर्णय, समस्या निर्धारणाची पध्दत आणि घेतलेल्या निर्णयांची प्रस्तुतता ही निवडणूकीच्या माध्यमातून निश्चित होत असते. राजकीय नेतृत्व निर्मितीत निवणूका या प्रशिक्षण संस्था म्हणून काम करतात.

निवडणूकीतील विजया व्यतीरिक्त संस्थात्मक उतरंडीनुसार व्यक्ती नेतृत्वस्थानी पोचते, मात्र पुन्हा त्या व्यक्तीला आपले नेतृत्व निवडणूकीमार्फत सिध्द करावे लागते व्यक्तीचे सामाजिक व संस्कृतीक स्थान, तसेच विविध कारणांनी मिळालेले दिव्यवलय किंवा प्रसिध्दी जी व्यक्तीला नेता बनविते. तर घाराणेशाही, ज्यामध्ये ठराविक कुटुंबातील विशिष्ट व्यक्तीलाच नेता म्हणून निवडले जाते किंवा ती व्यक्ती स्वत:ला नेता म्हणून घोषित करते. भारतातील नेतृत्व निर्मितीत घाराणेशाहीचा प्रभाव नेतृत्वाची निवड आणि निर्मितीत अधिक असल्याचे दिसून येते.

दाक्षिणात्य राज्यातील नेतृताचे स्वरुपय:

भारतातील प्रादेशीक राजकीय नेतृत्वाचा विचार करता आंध्रप्रदेश आणि कर्नाटक या दोन दाक्षिणात्य राज्यात काँग्रेस वर्चस्वाला आव्हान देत प्रादेशिक नेतृत्वाने अनुक्रमे तेलगु देसम आणि जनता दल यांनी आपले सर्चस्व प्रस्थापित केले. दोन्हीही राज्यात ही प्रक्रीय जवळपास नव्वदीच्या दशकातच सुरु झाली. या काळात दोन्ही राज्यातील राजकीय समिकरणे, राष्ट्रीय राजकारण व नेतृत्वाची भुमिका यातून नविन प्रादेशिक पक्ष व नेतृत्वाची निर्मिती झाली. मात्र या दोन्ही राज्यातील नेतृत्वाच्या कार्यप्रणालीमुळे येथिल राजकारणाचे स्वरुप भिन्नपणे विकसित झाले. १९८३ ते १९९५ मध्ये आंध्रप्रदेश मध्ये एन.टी. रामराव यांच्या स्वरुपात प्रादेशिक नेतृत्व उभे राहिले त्यांनी लोकानुनय (Populism) आणि अभिनय कलेचा (Theatrics) वापर केले. विविध विकास कार्यक्रम, अनेक प्रकल्प व अवास्तव सवलती जाहिर करत लोकांवर आपली छाप निर्माण करण्याचा प्रयत्न या नेतृत्वाने केला. पण त्यातून पुढे प्रतिकात्मक, घोषणावाद आणि खर्चिक लोकानुनय याचे स्तोम अतिशय वाढून या पध्दतीचे आंध्रप्रदेशच्या राजकारणात संस्थीभवन झाले. हिच परंपरा चंद्राबाबू नायडू यांनी वेगळया प्रकारे चालू ठेवली त्यानी विकासप्रकल्पावर जास्त भर दिला व त्याची प्रचंड प्रसिध्दी केली मात्र त्या विकासकामांचे नियंत्रण पक्षांतर्गत व पर्यायाने नायडूंच्याच फायद्याचे ठरेल याची व्यवस्था केली. हे सर्व प्रकल्प चंद्राबाबू नायडूंमार्फतच आहेत अशी जाहिरात केली. अनेक सार्वजनिक प्रकल्प हे प्रामुख्याने पक्षांशी निगडीत व निवडणूकित मदत करणाऱ्यांनाच दिले जात असत. एन.टी. रामराव यांच्यानंतर चंद्राबाबुंनीही स्थानिक शासन जाणिवपुर्वक मजबूत केले नाही. या उलट कार्नाटकातील सामुहिक नेतृत्वाची परंपरा मुख्यमंत्री देवराज यांनी

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - VI April 2015

*स्थापित केली होती. देवराज यांनी सर्वसमावेशक भुमिका कायमच घेतलेली आढळते. येथिल काँग्रस आणि जनता दल या दोन्ही पक्षात तशी परंपरा रुजली. जमिनदार, इतर मागास आणि दलित जातीतील नेतृत्वाचा सत्तेत एकत्र सहभाग असे. त्यातून उदारमतवादी आणि बहूलतावादी दृष्टिकोन येथिल राजकारणात विकसित झाला. साधनसंपत्ती, निधी, सेवा, यामध्ये विरोधी पक्षांबरोबरच जनतेतील स्वतंत्र संस्था संघटनांचाही समावेश त्यांनी केला. अशा प्रकारच्या नेतृत्वाच्या परंपरेमुळे आंध्रप्रदेशाप्रमाणे येथे विविध सामाजिक समस्या, विभक्तीकरणाच्या चळवळी उभ्या राहिल्या नाही असे ते म्हणतात. त्यांच्या मते भारतातील प्रादेशीक नेतृत्वाच्या निर्मितीस भारतातील केंद्रीय नेतृत्वही जबाबदार होते काँग्रसच्या केंद्रीय नेतृत्वाने ( इंदिरा गांधी व राजीव गांधी) यांनी राज्यातील नेतृत्वाला नेहमिच नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न केली. राज्यातील प्रभावी नेतृत्वात अनेकदा फुट पाडून कमकुवत नेत्यांना प्राधान्य दिले परिणामी आंध्रप्रदेश व कर्नाटकात काँग्रसेची सत्ता कमी होत गेली. यातून असे दिसते की भारतातील राष्ट्रीय नेतृत्वाच्या विशिष्ट वर्तनातून प्रादेशीक नेतृत्वाच्या निर्मीतीची प्रक्रिया स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर प्रादेशिक नेतृत्वाने काही ठिकाणी स्थानिक सामाजिक घटकांना सामावून घेवुन राजकारण करण्याचा प्रयत्न केला आहे किंवा लोकानुरंजनवादी भुमिका घेऊन हे नेतृत्व सातत्याने लोकांवर राज्य करते हे स्पष्ट केले आहे. लोकानुरंजनवादी व टोकाचा वैयक्तीक स्वार्थ अणि पक्षावरील प्रभुत्वातून आंध्रप्रदेश सारख्या राज्यात असे पक्ष व्यक्तीकेद्रीय नेतृत्वावर आधारीत असल्याचेही दिसून येते. अशा स्वरुपाच्या नेतृत्वाचा परिणाम सामाजिक विकास व एकात्म समाजाच्या वाढीविरोधात होतो. सर्व जाती, समुहांना सत्तेत सहभागी करणे, साधनांचे वाटप सर्व समाज घटकांत करणे यातून भारतासारख्या देशातील नेतृत्व परिपक्व होते. येथिल सामाजिक एकता व राष्ट्रीय एकात्मतेस असे नेतृत्वच गरजेचे राहिले आहे.*

*भारतातील नेते हे इतर देशातील नेत्यांशी तुलना करता येथिल नेतृत्व फार मोठया समाजाचे प्रतिनिधीत्व करत असतात. भारतात राष्ट्रीय स्तरावर विशिष्ट नेता असे दिसून येत नाही मात्र विविध राज्यात निर्माण होणाऱ्या नेतृत्वाचे विश्लेषण करतांना ते धर्म, प्रांत आणि भाषा या घटकांना महत्व देतात. भारतातील समाजातील सामाजिक व सांस्कृतिक वैविध्य आणि लोकशाहीकरणाची प्रक्रिया ही येथिल राजकारणात जास्तित जास्त नेते निर्माण करण्याचे कार्य करते.*

*भाषावार प्रांतरचनेचा नेतृत्व निर्मीतीवरील परिणाम:*

*भारतातील नेतृत्व सामाजिक व राजकीय बदलाबरोबरच विविध राजकीय धोरणे व महत्वपुर्ण घटनांतून राजकीय नेतृत्व बदलते किंवा नव नेतृत्वाची निर्मीती होते. भारतातील नेतृत्वाचे स्वरुप अधिक स्पष्ट स्वरुपात विषद केले असून त्यांनी नेतृत्वाची अधिमान्यता ही निवडणूकीतील विजयावर अवलंबून असते भारतात स्वातंत्र्योत्तर कालखंडात भाषावार प्रांतरचनेमुळे १९६० च्या दशकात प्रादेशिक नेतृत्वास महत्व प्राप्त झाले. या प्रक्रियेचे विश्लेषण करातांना प्रादेशिक नेतृत्व निर्मीतीत राज्य पुनर्रचनेच्या प्रक्रियेने केंद्रीय नेतृत्वातील सत्तेचे केंद्रीकरण झाले. यातून राज्य पातळीवर स्वतंत्र नेतृत्व व राजकीय पक्षांची निर्मीतीचे आकलन होण्यास मदत झाली. आधुनिकिकरण व लोकशाही करणाच्या प्रक्रियेतही स्थानिक वर्चस्व व स्थानिक ग्रामीण राजकारणात टिकुन असल्याचे यातून सिध्द होते. ग्रामीण भागातील राजकीय नेतृत्वाचे विश्लेषण हे केवळ*

*निवडणूकीतील जय पराजयातूनच नाही तर तेथे अस्तित्वात असणाऱ्या प्रस्थापित उतरंडीच्या व्यवस्थेवर आधारीत असते. स्थानिक ग्रामीण ग्रामीण नेतृत्व सरंजामशाहीकडून लोकशाहीकडे जाण्याच्या प्रक्रियेतून नेतृत्वाचे विविध समुहांत विकेंद्रीकरण झाल्याचे दिसून येते.*

*१९९० मधील प्रादेशीक पक्षाचे वाढलेले महत्व:*

*भारतात १९९० च्या दशकात प्रादेशिक नेतृत्व व प्रादेशिक पक्षांची वाढ व केंद्रिय राजकारणातील त्यांचे महत्व यातून आघाड्यांचे राजकारण अपरिहार्य झाले. आघाडयांच्या राजकारणात प्रादेशिक नेतृत्व व पक्षांचे महत्व निर्णायक ठरु लागले. याच कालखंडात राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात मागास जातींतील नेतृत्व व पक्ष राजकारण सक्रिय होत गेले. विविध जाती व समुहातील नेतृत्व विविध पातळयांवर उदयास येऊ लागले. राज्याच्या पातळीवरील राजकारणात पक्षीय व नेतृत्वाची स्पर्धा अधिकाधिक तीव्र होऊ लागली. यामध्ये राज्याच्या राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासात राज्यांचा स्वतंत्र अभ्यास, राज्यांतर्गत विविध पक्ष, आंदोलने, प्रादेशिक अस्मिता, राजकीय नेतृत्व, उपप्रदेशवाद इत्यादी बाबी महत्वाच्या मानल्या गेल्या.*

*१९९० च्या दशकात भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक मान्यता मिळाल्याने, स्थानिक पातळीवरील निवडणूका व राजकीय प्रक्रिया अधिकाधिक स्पर्धात्मक झाली. स्थानिक पातळीवरही विविध पक्ष आणि राजकीय नेतृत्वाच्या सत्तास्पर्धेला सुरुवात झाली. शासनाचे विकेंद्रीकरण आणि लोकसहभागाच्या नावाखाली स्थानिक शासनाला अधिक अधिकार व स्वायत्ता बहाल करण्याचे प्रयत्न झाले. या प्रक्रियेने स्थानिक शासन हे राजकीय व्यवस्था आणि लोकशाहीकरणाचे वाहक, विकासाचे व बदलाचे साधन मानले गेले. त्याचा परिणाम नव अभिजन नेतृत्व निर्मितीत झाला. स्थानिक शासनाला जास्तीचे अधिकार देणे, स्थानिक संस्था व नेतृत्वाला स्वायत्ता देणे तसेच स्थानिक पातळीवर लोकांचा जास्तीत जास्त सहभाग वाढवण्यासाठीचे प्रयत्न भारताबरोबरच इतर देशात ही याच कालखंडात सुरु होते (बोरझ् आणि जॉन २००४). राजकीय संस्थांतील हे विविध बदल राजकीय नेतृत्वाची निर्मिती व वर्तनास निर्धारित करत होते.*

*सारांश:*

*भारतीय राजकारणात झालेल्या आमूलाग्र बदलातून केंद्रीय, प्रादेशिक तसेच स्थानिक पातळीवरील राजकीय प्रक्रियेत लोकांचा सहभाग वाढला, राजकीय नेतृत्वाची भरती वाढली, राजकीय संस्थांमधील बदल तसेच बदलते सामाजिक आर्थिक वास्तव या प्रक्रियेतून समाजाच्या विविध स्तरातील नेतृत्व पुढे आले. परिणामी राजकीय प्रक्रियेची व्याप्ती राष्ट्रीय किंवा राज्यपातळीवर न राहता ती स्थानिक पातळीपर्यंत पोचली. लोकशाही विकेंद्रीकरण, वाढलेला लोकसहभाग, विभिन्न सामाजिक व आर्थिक समस्या आणि त्यावर आधारित सामाजिक चळवळी व आंदोलने, राजकीय संपर्काची बदललेली परिमाणे, साधने व प्रसारमाध्यमांची भूमिका यातून राजकीय प्रक्रियेत विविध स्तरातून नेतृत्व उदयास आले. संस्थात्मक राजकीय प्रक्रियेच्या बदलाचा परिणाम राजकीय नेतृत्वावर होत गेला. या बदलत्या राजकीय प्रक्रियेतून निर्माण झालेल्या नेतृत्वाच्या क्षमता या विविध घटकांमार्फत निर्धारित होतांना आढळतात.*

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - VI April 2015

***संदर्भ साहित्यसुची :***

1. Myron wiener, “Political Leadership in west Bengal, the Implications of its changing pattern of economic planning”. the Economic Weekly, July, 1959.
2. Sirsikar V. M. (1965) , “Political Leadership in India”, the Economic Weekly, 20th March, 1965
3. Hart, Henry C. (1991), “Political leadership in india: Dimension and limits, in India`s Democracy, An analysis of changing state Society Relations, Kohali Atul (ed) Princeton University Press, USA 1988 and Indian edition by Orient Longman ltd, Hyderabad.
4. James Manor (2004) “Explaining Political Trajectory in Andhra Pradesh and Karnataka” in Jenkins Rob (Ed), “Regional Reflections, Oxford University press New Delhi.
5. Guha Ramchandra, (2010) “Oxford companion to politica sceicne” Jayal Nirja and Pratap Mehata(Ed) Oxford Companion to politics in India, Oxford University Press, New Delhi.
6. Narain Iqbal, K.C. Pande, Mohan Lal Sharma (1976), The Rural Elite in An Indian State; A Case Study of Rajasthan, Monohar Book Services, New Delhi.
7. Kothari Rajani (1964) The congress System in India, Asian Survey, Vol.4.No12 December, pp 1161-73.
8. Palshikar Suhas and Rajeshwari Deshpande (2009), Redifine State politics in India: shift Towerds Comparisions: Theme note for Seminor on Contextualizing Maharashtra: Comparisons across States, 21-22 December 2009.
9. Palshikar Suhas and Rajeshwari Deshpande, (1999), Maharashtra Electroal Compitition and Stracture of Dominance, Occasional paper series II-I, Department of Politics and Public Administration, University of Pune, Pune.
10. Vora Rajendra and Palshikar Suhas (Ed) (2004), Indian Democracy Meaning and Practices, sage publication New Delhi.
11. Yadav Yogendra and Palshikar Suhas(2003), From Hegemony to Convergence: Party System and Electoral Politics in The Indian States. 1952-2002, Journal of Indian School of Political Economy, Vol. 15, Nos. 1 and 2. January-June, pp 5-4
12. Weiner, Myron(1957), Party Politics In India: The Development of A Multi-Party System: Princeton University Press, Princeton.